# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

महामंडळाची २७ वी बैठक दि.५.३.२००२

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (म.कृ.खो.वि.म.) यांच्या अध्यक्षतेखाली महामंडळाची २७ वी बैठक दि.५.३.२००२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.२७/१

"ठराव करण्यात येतो की, २६ व्या बैठकीमध्ये पारित केलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र. २७/२

"ठराव करण्यात येतो की,

अ. विषयसूचीतील परिशिष्ट क्र.२ मधील (१) नळदुर्ग औद्योगिक क्षेत्र पाणी पुरवठा योजना नळदुर्ग, ता. तुळजापूर (२) सिद्धनाथ शुगर मिल्स प्रा. लि. तिऱ्हे ता. उत्तर सोलापूर या दोन बिगर सिंचन पाणी पुरवठा परवाने मिळण्याच्या प्रस्तावास, "सदर प्रस्तावाचा पाणी वापर संबंधित प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनामध्ये समाविष्ट केला जाईल व दोन महिन्यांच्या पाणीपट्टीएवढी अनामत रक्कम पाणी वापर करणारी संस्था महामंडळाकडे भरेल, तसेच १९९० च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो संतुलन भाग (Balancing storage) स्वखर्चाने करील", या अटींवर महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ब. ज्या बिगर सिंचन योजनांमुळे १५ टक्के ते २५ टक्के मर्यादेपर्यंत पाणी कपात होणार आहे, अशा योजनांच्या बिगर सिंचन मागणीचे प्रस्ताव, संबंधित संस्था पाणीसाठ्याचा प्रमाणशीर खर्च महामंडळाकडे जमा करील, या अटींवर मान्य करण्यात यावेत."

ठराव क्र. २७/३

"ठराव करण्यात येतो की,

अ. सन २०००-०१ या आर्थिक वर्षाच्या रु. ११९२१.६१ कोटींचा ताळेबंद स्वीकृत करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ब. वित्तीय वर्ष १९९६-९७ ते १९९९-२००० या कालावधीतील स्वतंत्र लेखा परिक्षण अहवालामध्ये महालेखापालांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन मान्य करुन ते शासनास सादर करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

क. वित्तीय वर्ष २०००-२००१ या कालावधीतील अंतर्गत लेखा परिक्षणामध्ये अंतर्गत लेखा परिक्षकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन स्वीकृत करण्यात येत आहे.

ड. २०००-२००१ या आर्थिक वर्षाच्या ताळेबंदामध्ये दर्शविलेल्या unreconciled बाबींची यादी यापुढील बैठकीमध्ये महामंडळास सादर करण्यात यावी व या बाबींच्या समायोजनाची कार्यवाही अग्रक्रमाने होईल असे पहावे."

ठराव क्र. २७/४

"ठराव करण्यात येतो की,

अ. उद्दिष्टपूर्तीसाठी आखलेला कार्यक्रम पूर्ण करण्याच्या अनुषंगाने वर्ष २००२-२००३ या आर्थिक वर्षाच्या रु. ३९६८ कोटींच्या अर्थसंकल्पास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे. या अर्थसंकल्पास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

ब. शासनाच्या २००२-२००३ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये महामंडळासाठी किती भागभांडवलाची तरतूद आहे, त्याप्रमाणे अर्थसंकल्प सुधारित करण्यास, तसेच शासन सूचनांनुसार त्यामध्ये आवश्यक ते बदल करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

क. महामंडळाने मान्य केलेल्या वर्ष २००२-०३ च्या अर्थसंकल्पाप्रमाणे निधी प्राप्त न झाल्यास २००१-०२ या वर्षाचे २००२-०३ या वर्षात अदा कराचे लागणाऱ्या दायित्वाच्या अदायगीच्या व वर्ष २००२-०३ यावर्षी नवीन कामांवर करावयाच्या खर्चाचा प्राधान्यक्रम पुढील बैठकीत महामंडळासमोर मांडण्यात यावा.

ड. ज्या प्रकल्पांची व उपसा योजनांची कामे ३ वर्षात पूर्ण करता येतील असे प्रकल्प प्रकल्पनिहाय स्वतंत्र प्रकल्प अहवाल तयार करुन नाबार्ड अर्थसहाय्यासाठी प्रस्तावित करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

| | |
|---|---|
| मा. मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक |
| म.कृ.खो.वि.म., पुणे | म.कृ.खो.वि.म., पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ठराव क्र. २७/५

"ठराव करण्यात येतो की,

(अ) श्री. श्री. त्रिं. देवकुळे, निवृत्त प्रधान सचिव व श्री. के. एस. शंकरराव, निवृत्त अधीक्षक अभियंता यांची महामंडळाचे तांत्रिक सल्लागार म्हणून जानेवारी २००२ पासून एक वर्षासाठी पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांना देण्यात येणारे मानधन, प्रवासभत्ता, वाहन खर्च, दूरध्वनी, फॅक्स इ. खर्च निवासस्थान व्यवस्था याबाबतचा एकूण खर्च हा मागील पाच वर्षाच्या वार्षिक सरासरी खर्चाच्या मर्यादेत रहावा व त्या अनुषंगाने त्यांच्या सेवाशर्ती आवश्यकतेनुसार सुधारित करुन कार्यकारी संचालक यांच्या स्तरावर अंतिम करण्यात याव्यात.

या तांत्रिक सल्लागारांनी खालील बाबीविषयी काम करावे.

१. कृष्णा खोऱ्यातील पाणी वापराच्या माहितीचे संकलन व विश्लेषण

२. लवाद निर्णयाच्या अनुषंगाने आंतरराज्यीय बाबी

३. लवादाच्या अनुषंगाने सध्या चालू असलेल्या न्यायालयीन प्रकरणांसंबंधी राज्याच्या वकीलांना तांत्रिक माहिती व बाजू मांडण्यासाठी समन्वयाचे काम करणे.

४. ३१ मे २००० नंतर लवाद निर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी राज्याची बाजू समर्थपणे मांडण्यासाठी संदर्भ, निवेदन व सर्व संबंधित कागदपत्रे तयार करणे.

५. नवीन लवादासमोर जादा पाण्याची मागणी करण्यासाठी बृहत् आराखडा तयार करणे.

६. लवादाच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या इतर प्रकरणांवर अभ्यासपूर्वक सल्ला देणे.

(ब) श्री. प्र. ना. बेहरे, निवृत्त न्यायाधीश यांची महामंडळाचे कायदा सल्लागार म्हणून १.१.२००० ते ३१.१२.२००१ या कालावधीसाठी करण्यात आलेल्या नेमणुकीच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून यापुढे दि.१.१.२००२ ते ३१.३.२००२ या कालावधीसाठी त्यांची याच पदासाठी यापूर्वीच्या नेमणुकीच्या अटींवर फेरनियुक्ती करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म., पुणे

(क) दि.१.४.२००२ पासून पुढील कालावधीसाठी कायदा सल्लागाराच्या निवडी/नियुक्तीबाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीत महामंडळाचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा."

ठराव क्र. २७/६

"ठराव करण्यात येतो की, राज्य शासनाच्या महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या आस्थापनेस (सर्व संवर्ग) दि.१.९.२००१ नंतर मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास, शासनाची मंजुरी प्राप्त होईपर्यंतच्या कालावधीमध्ये, कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत."

ठराव क्र. २७/७

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील कामांच्या निविदा शर्तीमधील केवळ एव मुदतवाढ देण्याबाबतची तरतुदींमधील बदल करण्यात येत असून कंत्राटदारांना यापुढील मुदतवाढी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिशिष्ट क्र. ४२ अ.क्र. २५ नुसार देण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. २७/८

"ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाकडे दि.३१.१२.२००१ अखेर निवडसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या कंत्राटदारांना दि.३१.१२.२००२ अखेर मुदतवाढ देण्यास व सदर कंत्राटदाराचे दि.३१.१२.२००१ अखेरचे निवडसूची प्रमाणपत्र दि.३१.१२.२००२ पर्यंत ग्राह्य धरण्यास व त्यासाठी नियमित नुतनीकरणाच्या शुल्काच्या १/३ शुल्क आकारुन नुतनीकरण करण्यास, महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. कंत्राटदाराचे निवडसूची नुतनीकरण मंजूर झाल्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र पडताळून निविदा भरण्याची परवानगी देण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

३. दि.१.४.२००२ पासून महामंडळाच्या कामांसाठी कंत्राटदारांची स्वतंत्र निवडसूची तयार करण्याची पद्धती बंद करण्यात यावी. दि.१.४.२००२ पासून सार्वजनिक बांधकाम विभागाचे नोंदणी

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

प्रमाणपत्र असलेल्या कंत्राटदारांना महामंडळाच्या कामांच्या निविदा भरण्यास मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. २७/९

"ठराव करण्यात येतो की, तारळी पाटबंधारे प्रकल्पामुळे अंशत: बाधित होणाऱ्या मौ.बोपोशी या गावाचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्याच्या महसूल विभागाच्या प्रस्तावास महामंडळाची मान्यता देण्यात येत असून, त्या अनुषंगाने बोपोशी गावातील १०३ घरांचे पुनर्वसन करण्यासाठी होणारा अंदाजे रु. १.४५ कोटींचा खर्च तारळी प्रकल्पाच्या खर्चात समाविष्ट करण्यात यावा."

ठराव क्र. २७/१०

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना अंतर्गत म्हैसाळ भागातील टप्पा-१ व टप्पा-२ मधील दोन पंप चालू करुन बेडग कालवा किमी १ ते ९ व कळंबी शाखा कालवा किमी १ ते २७ मधील लाभक्षेत्रात उन्हाळी हंगामामध्ये (१ मार्च ते ३० जून २००२) अंदाजे २२०० हेक्टर क्षेत्रास सिंचन लाभ, लाभधारकांच्या खाजगी उपसा योजनेअंतर्गत देण्याच्या प्रायोगिक तत्वावरील प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रायोगिक तत्वावरील या योजनेच्या कार्यवाहीचा अहवाल जुलै २००२ मध्ये महामंडळास सादर करण्यात यावा.

१. दोन पंपासाठी चार महिन्यांचे डिमांड चार्जेस, वीज देयक, पाणीपट्टी व सेवाशुल्काची होणारी रक्कम लाभधारकांनी प्रथम महामंडळाकडे जमा करावी.

२. बेडग कालवा व कळंबी शाखा कालव्यातून लाभधारकांनी स्वत:च्या उपसा योजनेद्वारे पाणी उपसा करावे.

३. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने भारनियमन केल्यास अपुऱ्या पाणी पुरवठ्यासाठी महामंडळ जबाबदार राहणार नाही.

४. प्रायोगिक तत्वावरील या योजनेचे भौतिक व आर्थिक संनियंत्रण महामंडळाचे क्षेत्रीय मुख्य अभियंता मुख्य अभियंता (विप्र), पुणे यांनी अभ्यासपूर्वक व काळजीपूर्वक करावे."

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ठराव क्र. २७/११

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे अधिनियम १९९६ अंतर्गत कलम ४४(१) अन्वये केलेल्या तरतुदींनुसार घसारा निधी याविषयी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर अभिप्राय पुढील बैठकीत मांडून त्यानंतर याविषयी निर्णय घेण्यात यावा."

ठराव क्र. २७/१२

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या विविध विषयांबाबत अवलंबावयाची दि.२३.११.२००० पूर्वीची खंडीत केलेली कार्यपद्धती शासनाच्या दि.११.२.२००२ च्या पत्रातील सूचनांनुसार, दि.११.२.२००२ पासून यापुढे पुन्हा अवलंबविण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. २७/१३

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास अभ्युदय सहकारी बँकेचे सभासद व भागधारक होण्यास त्यानुसार महामंडळाने प्रस्तुत बँकेकडून प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे एकूण २० समभाग (शेअर्स) खरेदी करण्यास महामंडळाची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे."

ठराव क्र. २७/१४

"ठराव करण्यात येतो की, महामंडळामार्फत उभारण्यात येत असलेल्या विविध रोखे मालिकांद्वारे निधी जमा करण्याची कार्यवाही होत असताना, त्या मालिकेतील रोख्यांद्वारे उभारावयाचा अपेक्षित निधी पूर्णत: जमा होईपर्यंत व त्याबाबतची रोखे प्रमाणपत्रे संबंधित गुंतवणूकदारांना पाठविण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत त्या निधीचा वापर करु नये असे शासनाच्या उच्चाधिकार समितीचे आदेश आहेत. तथापि महामंडळातील विविध बाबींच्या प्रलंबित मागण्या/तातडीने अदा करावयाचे दायित्व यांच्या अदायगीच्या आवश्यकतेनुसार सदर मालिकेत जमा झालेला अंशत: प्राप्त निधी कार्यकारी संचालक यांनी वितरित करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे. महामंडळामार्फत करण्यात येत असलेल्या, अशा प्रकारच्या कार्यवाहीच्या या धोरणाबाबत शासनास अवगत करण्यात यावे."

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ठराव क्र. २७/१५

"ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळात बांधकामाधीन असलेल्या तारळी ता.पाटण जि.सातारा या प्रकल्पाच्या दगडो धरणाच्या बांधकामामध्ये धरणाच्या मध्यभागामध्ये, अनघड दगडो बांधकामाऐवजी **coal grout** पद्धतीचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव मुख्यत्वेकरुन (१) त्यामुळे वाढणारी धरणांची भूकंप प्रतिरोधक शक्ती (२) कमी प्रमाणात होणारी गळती (३) कोलग्राऊट बांधकाम केल्यामुळे भविष्यातील गळती प्रतिबंधक कामांवरील वाचणारा संभाव्य खर्च व (४) धरणांची वाढणारी स्थिरता, या बाबी विचारात घेऊन मान्य करण्यात येत आहे.

२. अनघड दगडो बांधकामाऐवजी, **coal grout** पद्धतीचे बांधकाम केल्याने खर्चामध्ये होणारी अंदाजे रु. ३६ कोटींची अपरिहार्य वाढ मान्य करण्यात येत आहे. या वाढीचा अंतर्भाव सुधारित अंदाजपत्रकामध्ये करावा व सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रक महामंडळास सादर करावे."

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म., पुणे